# आई...!!

लहानपणातल्या गोष्टी मला
आता खूप–खूप आठवतात.
त्या, लळा– जिव्हाळ्यासाठी
आता कंठ माझा दाटवतात.

कधीच पाठ थोपटल्या शिवाय
रात्री तू झोपली नाहीस
तुझ्या मायेची ऊब मी,
कधीच विसरली नाही.

दिवसभर दंगा, मस्ती केली,
म्हणून खोटंखोटं रागवायचीस.
हेच ते दिवस लेकीचे समजून
तूच आधी ती संधी द्यायचीस.

काम नको करायला म्हणून,
स्वत:च काम करायचीस.
"सासरी गेल्यावर करशीलच काम"
बोलून नेहमी मोकळीक द्यायचीस.

पक्षिणीच्या पिल्लासारखं
आम्हाला भरारी मारायला शिकवलंस
झेप घेण्याची वेळ आली तेव्हा
हसतहसत उडू दिलंस.

उडतउडत तुझी चिमणी
आता दूर देशी निघून आली.
आपल्या चिमण्या बरोबर ती
सुखाने संसार करू लागली.

कशी सांगू आई थोर तुझी पुण्याई,
इथे, तुझ्याच कुशीची ऊब नाही,
ना गात कोणी अंगाई,
आई थोर तुझी पुण्याई..............!!

**- माहिया कुलकर्णी** (कॅन्सस सिटी, कॅन्सस)